नियमीत फौजदारी खटला क्र. **५०/२०२१**
निशाणी क्र. **११५/क**

**<u>कलम २४४(१) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**
**(दृक–श्राव्य प्रणालीद्वारे)**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **शारदा शरद पोवार**
वय सुमारे : ४८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
निवासस्थान : ऐरोली, नवी मुंबई

**<u>सरतपासणी फिर्यादी पक्षातर्फे वकील कुमारी कविता परीट यांचेमार्फत</u>** :

दि. ०७/०४/२०२१ रोजी मी अलिबाग येथे उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. मधुकर शंकर ठाकूर यांनी तक्रारी अर्ज दिला होता. सदर अर्ज चौकशीकरीता तहसिलदार, अलिबाग यांच्याकडे पाठविला. मंडळ अधिकारी व तलाठी यांनी जागेवर जावून पंचनामा केला. रेवदंडा येथील सर्व्हे क्र. १२२/१अ या जमिनीसदंर्भात तक्रार होती. सहाय्यक संचालक नगररचनाकार यांच्याकडून अभिप्राय मागितला होता. आर.एफ्.ओ. कडून अहवाल व सॅटेलाईट नकाशे घेतले होते. एकूण २३ जणांविरुद्ध तक्रारी अर्ज दिला होता. आर.एफ्.ओ. यांनी अहवाल दिला होता की, सदर जागा सी.आर.झेड्. व कांदळवन सदृश्य आहे.

०२. तक्रारीसोबत मंडळ अधिकारी यांचा पंचनामा, तहसिलदार यांचा अहवाल, आर.एफ्.ओ. यांचा अहवाल व गुगल नकाशे दाखल केलेले आहेत.

**तांत्रिक कारणामुळे उर्वरीत सरतपास तहकूब करण्यात आला**.

समक्ष

अलिबाग. **( शै. वा. उगले )**
दिनांक : **२७/०६/२०२३**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**<u>पुढील सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद एस्. पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु (दृक–श्राव्य प्रणालीद्वारे)</u> :**

०३. कांदळवन होते हे सकृतदर्शनी दिसून आले. त्या सरकारी जागेवर आरोपींनी अनधिकृतपणे बंगले बांधलेले आहेत. कांदळवन तोडल्याबाबत पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत फिर्याद दिलेली आहे. फिर्याद निशाणी क्र. १ मधील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. गुगल मॅप, वनक्षेत्रपाल यांच्या अहवालावरुन मी आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केलेली आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२३/०९/२०२५.** मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**(दृक–श्राव्य प्रणालीद्वारे)**

**उलटतपास आरोपी क्र. १, ४, १२, १३, १६, १७, १९, २०, २१, २६ तर्फे वकील श्री. विद्येश गोंदकर यांचेमार्फत** :

०४. हे म्हणणे खरे आहे की, केस दाखल करण्यापूर्वी मी आरोपींना नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळाचा पंचनामा दाखल केलेला नाही. आरोपींच्या नावे जागा असल्याबाबत मी तलाठ्याकडून ७/१२ उतारा प्राप्त केला होता. मी घटनास्थळाचा नकाशा काढलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला तक्रार करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, केंद्र शासनाला तक्रार करण्याचा अधिकार या कायद्याखाली आहे.

०५. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून जागेची मोजणी करुन नकाशा काढलेला नाही. आरोपींनी ती जागा कधी खरेदी केली याबाबत मी माहिती घेतली होती. आरोपींनी जागा कधी घेतली याबाबत मी ७/१२ व फेरफार उतारे घेतलेले आहेत. आरोपींची नावे ७/१२ उताऱ्यावर कधी लागली याबाबत मी माहिती घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी केसमध्ये ॲसेसमेंट उतारे दाखल केलेले नाहीत.

०६. मी सी.आर.झेड. व एम.सी.झेड.एम.ए. यांच्याकडून अहवाल घेतला होता. मी मंडळ अधिकारी यांना घटनास्थळी पाठविले होते. आमच्या कार्यालयामार्फत आरोपींना बांधकामासंदर्भात नोटीस पाठविली नव्हती. मी बांधकाम किती आहे व किती घरे आहेत यासंदर्भात स्वत: चौकशी केली नाही. मी घरांचे फोटो घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी केसकामी ते कागदपत्र दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे

आहे की, अलिबाग, मुरुड व रेवदंडा हा समुद्रकिनाऱ्या लगतचा भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर समुद्रकिनाऱ्यालगत पूर्वीपासून घरे बांधलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अलिबाग, मुरुड व रेवदंडा येथे समुद्राची उच्चतम भरतीरेषा निश्‍चित झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींची घरे पूर्वीपासून त्या ठिकाणी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, नगर रचना कार्यालयाचा अभिप्राय मागवून घेतला नाही.

०७. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना सी.आर.झेड. अंतर्गत चुकीची नोटीस पाठविलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचे कागदपत्र दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नाही

**<u>उलटतपास आरोपी क्र. २, ५, ६, ८, १०, १८, २२, २३, २४ तर्फे वकील श्री. निलेश महाडिक यांचेमार्फत</u>** :

०८. माझ्या फिर्यादीमध्ये कांदळवनाची तोड केल्याबाबत कुठेही उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, मधुकर ठाकूर यांनी दिलेल्या तक्रारी अर्जावरुन मी फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मधुकर ठाकूर यांनी त्यांच्या तक्रारी अर्जात कुठेही कांदळवनाचा उल्लेख केलेला नाही. मी मधुकर ठाकूर यांचा जबाब नोंदवलेला नाही.

०९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचे सर्व्हे क्रमांक व सर्व्हे क्रमांक १२२/अ/१अ/१अ/१ हा वेगळा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वत: जागेवर जावून कोणताही तपास केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी २०० ते ५०० मीटरच्या आत बांधकाम केल्याचे व सी.आर.झेड.–३ चे उल्लंघन केले हे मी खोटे सांगत आहे.

**आरोपी क्र. १, ४, १२, १३, १६, १७, १९, २०, २१ करीताचा उलटतपास स्वीकारला.**

**<u>उलटतपास आरोपी क्र. ११ तर्फे वकील श्री. बी.जी. पाटील यांचेमार्फत</u>** :

१०. हे म्हणणे खरे आहे की, मला कलम १९ अंतर्गत केंद्र शासनाने केस दाखल करण्याचे अधिकार दिल्याबाबत आदेशाचे पत्र या केसकामी दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र. १२२/१/१अ/१ब ही जागा सरकारने रेवदंडा सामुहीक सहकारी कृषी संस्था यांना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, ती जागा सरकारने दिली असल्यामुळे त्या जागेमध्ये कांदळवन नव्हते.

११. हे म्हणणे खरे आहे की, त्या जागेमध्ये बांधकाम केल्यासंदर्भात मी ॲसेसमेंट उतारे दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, नगर रचना विभागाने पाठविलेल्या अभिप्रायामध्ये गट क्रमांक असे नमूद केलेले आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्या गावाला गट लागत नाही. हे म्हणणे खरे आहे की, रेवदंडा सामुहीक सहकारी कृषी संस्था यांना भूखंड १९६७ साली देण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, १९६७ पासून ते दि. ०७/१२/२०१८ पर्यंत त्या ठिकाणी बांधकाम आहे किंवा नाही याबाबत आमच्या कार्यालयामार्फत कोणतीही चौकशी करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या भूखंडासंदर्भात आमची कोणतीही तक्रार नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मधुकर ठाकूर यांनी पत्र दिल्यानंतर आम्ही चौकशी करुन तक्रार दाखल केलेली आहे.

१२. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या प्लॉटमध्ये कोणत्या वर्षी बांधकाम झाले याबाबत मी फिर्यादीमध्ये उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीमध्ये नमूद असल्याप्रमाणे बांधकाम केले हे मी खोटे सांगत आहे.

**इतर आरोपींचा उलटतपास स्वीकारला.**

**<u>उलटतपास आरोपी क्र. ९ तर्फे वकील श्री. आर. एम. कुंटे यांचेमार्फत</u>** :

१३. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वत: जागेवर जावून पाहणी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनामा केला त्यावेळी हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींना आम्ही जागेची पाहणी करण्यास येणार असल्याबाबत नोटीसा दिल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीमध्ये नमूद असल्याप्रमाणे आरोपी क्र. ९ ने कोणतेही बांधकाम केलेले नाही. हे मला माहीत नाही की, आरोपीने सरकारने दिलेल्या नोटीस संदर्भात दिवाणी दावा दाखल केलेला आहे. हे मला माहीत नाही की, ९६/२००७ हा दिवाणी दावा आरोपीने दाखल केलेला आहे. हे मला माहीत नाही की, दि. २५/११/२०२१ रोजी अलिबाग येथील दिवाणी न्यायालयाने आम्ही पाठविलेल्या नोटीसा बेकायदेशीर आहेत असा निकाल दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ९ विरुद्ध मी चुकीची कार्यवाही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ९ विरुद्ध चुकीची केस दाखल केलेली आहे.

**इतर आरोपींचा उलटतपास स्वीकारला.**

**<u>उलटतपास आरोपी क्र. १४ तर्फे वकील श्री. कुणाल गावंड यांचेमार्फत</u>** :

१४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी भूखंड क्र. ४३ मध्ये कोणतेही बांधकाम केलेले नाही.

**इतर आरोपींचा उलटतपास स्वीकारला**.

**<u>उलटतपास आरोपी ७ तर्फे वकील श्रीमती उत्तरा मयेकर यांचेमार्फत</u>** :

**इतर आरोपींचा उलटतपास स्वीकारला**.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१७/१२/२०२५.** मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **५०/२०२१**
निशाणी क्र. **२२३/क**

**(दृक–श्राव्य प्रणालीमार्फत)**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **सचिन लक्ष्मण शेजाळ**
वय सुमारे : ४६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
निवासस्थान : कॅम्प रोड, सिव्हील लाईन्स, अमरावती

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद एस्. पाटील यांचेमार्फत</u>:**

०१. दि. ०७/०४/२०२१ रोजी मी अलिबाग येथे तहसिलदार, अलिबाग म्हणून कार्यरत होतो. दि. ०५/०४/२०२१ रोजी मंडळ अधिकारी, चौल यांनी अहवाल सादर केला होता. त्या अहवालानुसार रेवदंडा येथील सर्व्हे क्र. १२२/१/१अ/१/अ/१ब मध्ये अनधिकृत बांधकाम करुन सी.आर.झेड्.च्या नियमावलीचा भंग केला होता. त्याअनुषंगाने ज्या ३१ लोकांनी सी.आर.झेड्.च्या नियमावलीचा भंग केला होता त्यांनी केलेल्या बांधकामाचे स्वरुप व क्षेत्रफळ याबाबत दि. ०७/०४/२०२१ रोजी मा. उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांना लेखी अहवाल सादर केला होता.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १, ४, १२, १३, १६, १७, १९, २०, २१, २६ तर्फे वकील श्री. विद्येश गोंदकर यांचेमार्फत</u>** :

०२. अलिबाग ते मुरुड समुद्रकिनारपट्टीवर भरपूर घरे वसलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी व्यक्तीशः घटनास्थळावर गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे

की, मी आरोपींना नोटीसा दिल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या जागेचे ॲसेसमेंट उतारे घेतले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, बांधकाम केलेल्या घराचे नकाशे मी घेतले नाहीत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, पंचनामे केलेले आहेत.

०३. हे म्हणणे खरे नाही की, अलिबाग ते मुरुड समुद्राची उच्चतम भरती रेषा निश्चित केलेली नाही. हे मला सांगता येणार नाही की, विधानसभेत मंत्र्यांनी प्रश्न उपस्थित केल्यामुळे फक्त रायगड करीता केसेस दाखल करण्यात आल्या होत्या. हे मला सांगता येणार नाही की, आरोपींची घरे पूर्वीपासून आहेत. मी आरोपींच्या घराचे ॲसेसमेंट उतारे प्राप्त केले नाहीत. मी घरांचे फोटो दाखल केलेले नाहीत.

०४. हे मला सांगता येणार नाही की, आरोपींनी दिवाणी दावे दाखल केलेले आहेत व निर्णय त्यांच्या बाजूने लागलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी सी.आर.झेड्. कायद्याचे उल्लंघन केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणतेही नवीन बांधकाम केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, बांधकाम पूर्वीपासून आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा अहवाल दिलेला आहे.

**उलटतपास आरोपी क्र. २, ५, ६, ८, १०, १८, २२, २३, २४ तर्फे वकील श्री. निलेश महाडिक यांचेमार्फत** :

०५. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र. १२२/१/१अ/१/अ/१ब ही मिळकत आरोपींना सरकारने १९६८ साली शेतीसाठी दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व्हे क्र. १२२/१/१अ/१/अ/१ब मध्ये आरोपींनी अनधिकृत बांधकाम केलेले आहे.

०६. हे म्हणणे खरे आहे की, मंडळ अधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्यानुसार

मी माझा अहवाल तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, नगर रचना विभागाने अभिप्राय दि. १४/०७/२०१५ रोजी पाठविलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, नगर रचना विभागाने दिलेल्या अहवालामध्ये सर्व्हे क्र. १२२/१ एवढाच नमूद आहे.

०७. अलिबाग ते मुरुड समुद्राची उच्चतम भरती रेषा निश्चित झाल्याबाबत अहवाल मी या केसमध्ये दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्याची आवश्यकता नाही. ते पब्लीक डॉक्युमेंट आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा अहवाल दिलेला आहे.

**उलटतपास आरोपी ७ तर्फे वकील श्रीमती उत्तरा मयेकर यांचेमार्फत :**

वरील उलटतपास स्वीकारला.

**उलटतपास आरोपी क्र. ९ तर्फे वकील श्री. आर. एम. कुंटे यांचेमार्फत :**

वरील उलटतपास स्वीकारला.

**उलटतपास आरोपी क्र. ११ तर्फे वकील श्री. बी.जी. पाटील यांचेमार्फत :**

वरील उलटतपास स्वीकारला.

**उलटतपास आरोपी क्र. १४ तर्फे वकील श्री. अभिजीत बागवे यांचेमार्फत :**

०८. हे म्हणणे खरे आहे की, मी कागदपत्र पाहून अहवाल दिलेला आहे. जागेवर जावून स्थळपाहणी करुन अहवाल दिलेला नाही. दि. १२/०१/२०२१ रोजीचा पंचनामा मी पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ४३ नंबर कडील कॉलममध्ये शेती/ओसाड असे नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, स्थळपाहणी केली असता घटनास्थळी उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले नाही.

०९. हे म्हणणे खरे नाही की, उल्लंघनाबाबत ठोस पुरावा प्राप्त झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०२/०२/२०२६.** मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.